# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 06.12.2018 गुरूवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे. बजाजनगर – फसवणुक :**

दि. 07.06.2017 ते दि. 06.12.2018 दरम्यान आरोपी वैशाली उर्फ त्रिशा सुदर्शन येणेवार, वय 28 वर्ष रा. प्लॉट नं. 34, दक्षिण पुर्व रेल्वे पहिले ले आउट, प्रतापनगर रोड, नागपूर यांनी पो.स्टे. बजाजनगर हद्दीत दुर्गा माता मंदीर समोर, दिनशा आईस्क्रिम पार्लर जवळील रेस्टारंट येथे फिर्यादी अनिकेत रमेश पाटील, वय 25 वर्ष रा. न्यु खदान, लष्करीबाग आवळे बाबु चौक, हाउस नं. 40, पाचपावली, नागपूर यांना व त्यांचे तीन मित्रांना खाजगी कंपनीत व सरकारी रेल्वे विभागात उच्च पदावार नोकरी लावून देतो असे म्हणुन फिर्यादीकडुन 4,00,000 रू व फिर्यादीचे मित्राकडुन 1,00,000 रू. स्विकारून खाजगी कंपनी व सरकारी रेल्वे विभागात नोकरी लावण्याकरीता खोटे दस्ताऐवज बनवून ते खरे असल्याचे भासवून फिर्यादीची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. बजाजनगर येथे मपोउपनि राणे, 7507303999 यांनी आरोपविरूध्द कलम 420,468,471 भांदवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे. यशोधरानगर – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दि. 05.12.18 चे 0830 वा चे सुमारास पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत राहणारे फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही घरून निघुन गेली परत आली नाही. शोध घेतला असता परत आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायलयाचे निर्देशनानुसार पो.स्टे. यशोधरानगर येथे पोहवा राजेश, 7020707326 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

### (अकस्मात मृत्यु)

**1) पो.स्टे सक्करदरा, गणेशपेठ, अंबाझरी, जरीपटका :**

**1) सक्करदरा** – दि. 06.12.18 चे 0900 वा चे सुमारास कय्युम, वय 60 वर्ष हे पो.स्टे. सक्करदरा हद्दीत मोठा ताजबाग दर्गाचे भिंतीचे कंपाउडजवळ मृत अवस्थेत मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी अन्वर अहमद मुक्तार अहमद, वय 52 वर्ष रा. ताज अम्मा कॉलनी, मोठा ताजबाग, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. सक्करदरा येथे पोउपनि हिवरकर, 9552585883 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**2) गणेशपेठ** – दि. 05.12.18 चे 1830 चे सुमारास पो.स्टे. गणेशपेठ हद्दीत रजत संकुल अपार्टमेंट विंग 2, फ्लॅट नं. 505, एसटी बस स्टॅण्ड समोर, राहणा–या सौ. गुंजन दिपक शर्मा, वय 40 वर्ष यां चक्कर येवून खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला असता त्यांना उपचाराकरीता ग्रिन केअर हॉस्पिटल येथे नेले तेथून रेफर मेडिकल हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे पोउपनि शिंदे, 9822779401 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**3) अंबाझरी** – दि. 06.12.18 चे 1615 वा पुर्वी विलास तुकारामजी सातपुते, वय 56 वर्ष रा. प्लॉट नं. 87, इंद्रप्रस्थ नगर, सोनेगाव, नागपूर यांचे प्रेत पो.स्टे. अंबाझरी हद्दीत अंबाझरी तलावाच्या पाण्यात तरंगताना मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी निखिल विलास सातपुते, वय 31 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. अंबाझरी येथे मपोउपनि शेख, 9623261100 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**4) जरीपटका** – दि. 05.12.18 चे 1400 वा चे सुमारास पो.स्टे. जरीपटका हद्दीत प्लॉट नं. 66, हाउसिंग बोर्ड सोसायटी, नागपूर येथे राहणारे गुरूमुखदास प्रितमदास सचदेव, वय 60 वर्ष यांनी राहते घरी वरच्या मजल्याचे जिन्याला बेडशिटच्या सहायाने गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी सौ. श्वेता मनिष सचदेव, वय 30 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. जरीपटका येथे सपोउपनि ढवळे, 9637592960 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**(ईतर)**

**1) पो.स्टे. गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :**

गुन्हयातील आरोपी व पदाधिकारी कार्यकर्ते असुन त्यांनी दि.14/01/12 रोजी टिळक पत्रकार भवन येथे पत्रकार परिषद घेवुन दि.16/01/12 पावेतो त्यांचा मागण्या पुर्ण न झाल्यास शहरात स्टार बस चालु देणार नाही असे जाहिर केले होते व त्यांनी दिलेल्या चेथावणी वरून दिनांक 17.01.12 रोजी 11.00 वा दरम्यान कॉटन मार्केट, जयश्री टॉकिज जवळ रोडवर पो.स्टे.गणेशपेठ, नागपूर यातील फिर्यादी हे स्टार बस क्र. एम.एच.31/सी.ए.5072 घेवुन जात असताना दोन अनोळखी इसम पुढे येवुन मागे बसलेल्या अनोळखी इसमाने दगड मारून स्टार बसचे समोरील काच फोडुन अंदाजे 5000/–रू व सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान केले. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

परंतु नमुद आरोपी याचा वारंवार शोध घेतला तो मिळुन न आल्याने गुन्हयाचे तपासा दरम्यान नमुद आरोपी विरूध्द कलम–299 जा.फौ. प्रमाणे दोषारोप पत्र मा. कोर्टात दाखल करण्यात आले होते.

परंतु आज रोजी पो.स्टे. चे फरार पाहिजे शोध पथक प्रमुख सपोउपनि मधुकर शिर्के, पो.स्टे.गणेशेपठ नागपूर शहर यांनी नमुद आरोपी नामे विरेन्द्र एकनाथ सहारे, वय–46वर्ष, रा–लोकांची शाळा, सिरसपेठ, माटीपुरा, पो.स्टे. इमामवाडा नागपूर याचा शोध घेवुन त्यास 6 वर्षानंतर पकडुन त्यास दाखल गुन्हयात अटक करून मा.कोर्टात हजर केले आहे.

तरी मा.श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त साहेब परि.क्र.3 नागपुर शहर, मा.श्री. राजरतन बनसोड सहा.पोलीस आयुक्त, कोतवाली विभाग नागपूर, यांचे मार्गदर्शनाखाली सदरची कामगीरी व.पो.निरीक्षक सुनिल गांगुर्डे, तपास पथक प्रमुख पोउपनि ए.पी.आत्राम, सपोउपनि मधुकर शिर्के यांनी पार पाडली

**2) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–**

नागपूर शहरात आज दि. 06.12.2018 रोजी मा. पोलीस उप आयुक्त (परि.क्र.3) श्री. राहुल मातनीकर, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर